॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २२ (              )    सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत रविवार, दिनांक २३ जून, २०१९ रोजी जळगाव शहरातील ०८ केंद्रावर सेट (राज्यस्तरीय पात्रता चाचणी) परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून या परीक्षेसाठी ३३०२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

या परीक्षेसाठी खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय परिसरातील- स्वामी विवेकानंद भवन- अ (केंद्र संकेतांक क्र.१४०१) व ब (केंद्र संकेतांक क्र.१४०२), शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केंद्र संकेतांक क्र.१४०३), केसीई सोसायटीचे इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च (केंद्र संकेतांक क्र.१४०४), केसीई सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय (केंद्र संकेतांक क्र.१४०५), ॲड.सिताराम (बबनभाऊ) आनंदरामजी बाहेती महाविद्यालय (केंद्र संकेतांक क्र.१४०६), पी.एन.लुंकड कन्या शाळा (केंद्र संकेतांक क्र.१४०७) व ओरियन सीबीएसई स्कुल (केंद्र संकेतांक क्र.१४०८) या ०८ केंद्रांवर सेट परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षासाठीचे प्रवेशपत्र (Hall Ticket) हे setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी कुलसचिव भ.भा.पाटील यांच्याशी मो.नं. ९४२३१८५०७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. २२ (              ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने खुल्या महाविद्यालयीन निवडणूका संदर्भात जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक, विद्यार्थी विकास अधिकारी यांच्यासाठी समन्वय व सहविचार कार्यशाळा गुरुवार, दि.२७ जून, २०१९ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम २०१६ नुसार विद्यापीठ क्षेत्रात खुल्या महाविद्यालयीन निवडणूका घ्यावयाच्या आहेत. त्याकरीता संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक, विद्यार्थी विकास अधिकारी यांच्यासाठी समन्वय व सहविचार कार्यशाळा विद्यापीठाच्या अधिसभागृह (सिनेट हॉल) येथे दि. २७ जून, २०१९ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेत शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० विद्यार्थी परिषद निवडणूक, विद्यार्थी परिषद निवडणूक आरक्षण सोडत, दिव्यांग कक्ष मार्गदर्शन आणि विद्यार्थी विकास विभागाचे विविध उपक्रम याबद्दलची माहिती दिली जाणार आहे. महाविद्यालयीन निवडणूकी संदर्भात मा.प्राचार्य अनिल राव हे या कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनी कळविले आहे.

..२..

**बातमी क्र.३**

जळगाव दि.२२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जाहिर करण्यात आले आहेत.

महाविद्यालयांमध्ये जळगाव जिल्हयातून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव या महाविद्यालयाला रासेयो एकक उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जाहिर झाला आहे. धुळे जिल्हयातून एस.एस.व्ही.पी.एस.चे डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे तर नंदूरबार जिल्हयातून कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूरला पुरस्कार जाहिर झाला आहे. उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारीचा पुरस्कार जळगाव जिल्हयातून डॉ.कांचन दशरथ महाजन ( कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव), धुळे जिल्हयातून डॉ.दत्ता आसाराम ढाले (एस.एस.व्ही.पी.एस.चे डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे) तर नंदूरबार जिल्ह्यातून डॉ.नामदेव नरसिंगराव गजरे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर) यांना पुरस्कार जाहिर झाले आहेत. विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जळगाव जिल्हा कांचन जिवन चव्हाण (सामाजिकशास्त्र प्रशाळा, समाजकार्य विभाग, कबचौ उमवि, जळगाव), धुळे जिल्हा गणेश सुनील उफाडे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविलय, मोराणे,ता.जि.धुळे ) तर नंदूरबार जिल्हा अनिल जहागू गावित (कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,नवापूर, जि. नंदूरबार) यांना हे पुरस्कार जाहिर झाले आहेत. या पुरस्काराचे वितरण कार्यक्रम यथावकाश जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा.पंकजकुमार नन्नवरे यांनी दिली.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २२ जून, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी
यांच्या करिता